दिनांक  23/03/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.157

विषय – नगरपरिषदेसाठी क्लॉथ वेंडींग मशीनसाठी कापडी पिशव्या खरेदी करणेबाबत
निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 01/03/2023 ने आरोग्य निरिक्षक व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

विटा शहराने मागील 5 वर्षामध्ये स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षण 2021 मध्ये संपूर्ण देशामध्ये प्रथम क्रमांक व स्वच्छ सर्वेक्षण 2022 मध्ये पश्चिम भारतात दुसरा क्रमांक प्राप्त केला आहे. त्या अनुषंगाने नाविण्यपुर्ण उपक्रम म्हणून विटा नगरपरिषदेने प्लास्टिक बंदीचे अनुषंगाने शहरामध्ये विविध ठिकाणी बसविणेत आलेल्या क्लॉथ वेंडींग मशीन बसविणेत आलेल्या आहेत. सदर मशीनसाठी कापडी पिशव्या खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी विटा नगरपरिषदेसाठी प्लास्टिक बंदीचे अनुषंगाने शहरामध्ये विविध ठिकाणी बसविणेत आलेल्या क्लॉथ वेंडींग मशीनसाठी कापडी पिशव्या खरेदी करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा